**२०१६-१७ मध्ये आयोजित जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत राज्यस्तरीय महात्मा ज्योतिबा फुले जलमित्र पुरस्कारासाठी निधी वितरीत करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**

**जलसंधारण विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः मफुअ-२०१३/प्र.क्र.३७/जल-८**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १० मार्च, २०१७

<u>ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक</u>

(१) जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७ दिनांक ५ डिसेंबर, २०१४.
(२) मफुअ-२०१३ /प्र.क्र.३७ / जल-८ दिनांक २८ सप्टेंबर, २०१६.
(३) मफुअ-२०१३ /प्र.क्र.३७ / जल-८ दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६.
(४) शासन शुध्दीपत्रक क्र.मफुअ-२०१३/प्र.क्र.३७/जल-८ दिनांक ३० नोव्हेंबर, २०१६
(५) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः अर्थसं-२०१६/प्र.क्र.८९/अर्थ-३, दिनांक २० एप्रिल, २०१६

**<u>प्रस्तावना :</u>**

राज्यातील टंचाईवर कायमस्वरुपी उपाय योजना करण्यासाठी शासनाने दिनांक ०५ डिसेंबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये जलयुक्त शिवार अभियान सुरु केले आहे. या जलयुक्त शिवार अभियानात उत्कृष्ठ योगदान देण्याऱ्या जिल्हा, तालुका आणि गावांना पुरस्कार प्रदान करण्यास तसेच सदर अभियानाच्या अनुषंगाने स्वत:च्या उत्कृष्ट लिखणाद्वारे वृत्तपत्रातून जलसंधारणाचे महत्व सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहचविणाऱ्या पत्रकारांस पुरस्कार देण्याचे निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार **गाव, तालुके, जिल्हे, पत्रकार, व्यक्ती, अशासकीय संस्था यांना राज्यस्तरावर पुरस्कारासाठी** संदर्भाधीन दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

राज्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत उत्कृष्ट काम करणा-यांना राज्य, विभाग व जिल्हा स्तरावर खालील नावाने पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

| स्तर | पुरस्कारांची नावे |
|---|---|
| राज्यस्तर | महात्मा ज्योतिबा फुले जलमित्र पुरस्कार |
| विभागस्तर | राजमाता जिजाऊ जलमित्र पुरस्कार |
| जिल्हास्तर | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलमित्र पुरस्कार |

सन २०१६-१७ साठी अर्थसंकल्पित रु.१०००.०० लक्ष निधीतून **पत्रकार पुरस्कारासाठी व गाव, तालुका, जिल्हा स्तरावरील पुरस्कारासाठी एकूण रक्कम** रु. ७११.९८ व पुरस्काराच्या आयोजनासाठी रु. २४.०० लक्ष निधी असा एकूण रु. ७३५.९८ लक्ष संदर्भाधीन क्र. ३ येथील दिनांक ९/११/२०१६ च्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आला आहे.

**उर्वरित रक्कम राज्यस्तरावरील महात्मा ज्योतिबा फुले जलमित्र पुरस्कारासाठी खालीलप्रमाणे वितरीत करावयाची आहे.**

| | |
|---|---|
| **राज्यस्तरावरील पुरस्काराची एकूण रक्कम** | **रु.३.३२ लाख + २०७.५० लाख +३.३० लाख = रु.२१४.१२ लाख** |
| **पुरस्काराच्या आयोजनासाठी लागणारी रक्कम** | **रु. ४९.९० लाख** |
| **एकूण** | **रु. २६४.०२ लाख** |

वरीलप्रमाणे पुरस्कार देण्याचे प्रस्तावित असून सदर पुरस्कारासाठी रु. २१४.१२ लक्ष व पुरस्काराच्या आयोजनासाठी रु. ४९.९० लक्ष निधी असा एकूण रु. २६४.०२ लक्ष निधी सन २०१६-१७ साठी अर्थसंकल्पित रु.१०००.०० लक्ष निधीतून वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

जलयुक्त शिवार अभियानात उत्कृष्ट योगदान देणारे गाव, तालुके, जिल्हे, पत्रकार, व्यक्ती, अशासकीय संस्था पुरस्कारावर, सन २०१६-१७ साठी मंजूर अर्थसंकल्पित रु. १०००.०० लक्ष निधीतून सदर पुरस्कारासाठी रु. २१४.१२ लक्ष व पुरस्काराच्या आयोजनासाठी रु. ४९.९० लक्ष निधी असा एकूण रु. २६४.०२ लक्ष निधी (रुपये दोनशे चौसष्ट लक्ष दोन हजार फक्त) वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सदर पुरस्काराची व पुरस्कार आयोजनाची रक्कम आहरित करुन त्यानंतर पुरस्कारासाठी व पुरस्कार आयोजनासाठी खर्च करण्यास शासन मंजूरी आहे.

२. जलयुक्त शिवार अभियानात उत्कृष्ट योगदान देणा-या गाव, तालुके, जिल्हे, पत्रकार, व्यक्ती, अशासकीय संस्था यांच्या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी एकूण रक्कम रु.२१४.१२ लक्ष निधी विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांना वितरीत करण्यात येत आहे.

३. जलयुक्त शिवार अभियानात उत्कृष्ट योगदान देणा-या गाव, तालुके, जिल्हे, पत्रकार, व्यक्ती, अशासकीय संस्था यांच्या राज्यस्तरीय पुरस्कार कार्यक्रमाचे आयोजन, सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र तयार करण्यासाठी एकूण रक्कम रु.४९.९० लक्ष निधी विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांना वितरीत करण्यात येत आहे.

४. या पुरस्कार योजने अंतर्गत जलमित्र पुरस्कारासाठी करण्यात येणारा खर्च खालील लेखाशिर्षांतर्गत मंजूर केलेल्या निधीतून खर्च करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**" मागणी क्र.एल- ३, २४०२-मृद संधारण**

**(००) (१०२) मृद संधारण- (०४) मृद व जलसंधारण**

**(०४) (०१) महात्मा ज्योतिबा फुले जल मित्र पुरस्कार (२४०२ १०३७) ०५, बक्षिसे "**

**५. हा निधी कोषागारातून आहरण व संवितरण करिता उप आयुक्त (रोहयो) विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून विभागीय आयुक्त यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.**

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या परिपत्रक क्रमांक क्रमांक : अर्थसं-२०१६/प्र.क्र.८९/अर्थ-३, दिनांक २० एप्रिल, २०१६ अन्वये व प्रशासकिय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच नियोजन विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीने अनुक्रमे अनौपचारिक संदर्भ क्रमांक : २१९/का.१४३४, दिनांक ४/११/१६ व क्र.५०२/२०१६/व्यय-१५, दिनांक ८/११/१६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे

सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक **२०१७०३१०१२००२७४४२६** असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shankar Trambak Jadhav

Digitally signed by Shankar Trambak Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD and Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cccfd79237cd08ae181b91f021d984be73c43b02234d4c07b7da787cf666bc54, cn=Shankar Trambak Jadhav
Date: 2017.03.23 16:39:00 +05'30'

**( शं. त्र्यं. जाधव )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१.मा.राज्यपाल यांचे सचिव,
२.मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
३.मा.विरोधी पक्षनेते विधान परिषद व विधानसभा यांचे सचिव,
४.मा.मंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
५.मा.राज्यमंत्री, (जलसंधारण) याचे खाजगी सचिव
६.सर्व मा.मंत्री, राज्यमंत्री याचे खाजगी सचिव,
७.कार्याध्यक्ष, आदर्शगांव संकल्प व प्रकल्प समिती,
८.मुख्य सचिव यांचे सहसचिव,
९.सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग,
१०.प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
११.सर्व विभागीय आयुक्त,
१२.आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१३.सर्व जिल्हाधिकारी,

१४.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१५.सामाजिक वनीकरण वृत्ते,
१६.सर्व मुख्य संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१७.सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे,
१८.मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे
१९.प्रधान मुख्य वनसंरक्षक व संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२०.संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
२१.सर्व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
२२.सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
२३.सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय ( सर्व),
२४.सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२५.सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे/ सर्व अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे, (स्थानिक स्तर)
२६.संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
२७.महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता ),
२८.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
२९.सर्व मुख्य वन संरक्षक व उपसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते,
३०.सर्व सहसंचालकवनसंरक्षक,/ सर्व उपवनसंरक्षक,
३१.वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
३२.महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषदेचे सर्व अशासकीय सदस्य,
३३.महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
३४.महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
३५.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३६.सर्व मंत्रालयीन विभाग,
३७.कृषि व पदुम विभाग (राकृवियो कक्ष), मंत्रालय, मुंबई
३८.संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
३९.सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, जलसंधारण विभाग,
(जलसंधारण उप विभाग), मंत्रालय, मुंबई
४०.जल-८ (निवड नस्ती), ग्रा.वि.व ज.सं.विभाग, मंत्रालय, मुंबई